D:\Sanas\Letter to CCF reg Symbiosis society pune.doc

**उपवनसंरक्षक, पुणे वनविभाग पुणे, यांचे कार्यालय सेनापती बापट मार्ग, पुणे-४११००४**

परि/२/६६ - ९५

विषय :- वन जमीन पुणे
मौजे भांबुर्डा येथील सर्व्हे नंबर ८१ व ९४ मधील ०.७४४६ हेक्टर क्षेत्राचा वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गतचा प्रस्ताव.
सिम्बॉयसिस सोसायटी पुणे.

जा. क्र. कक्ष ३/जमीन/ ३२९ /२००५-२००६.
पुणे - ४११ ००४, दिनांक १४ जून २००५.

प्रति,

संचालक,
सिम्बॉयसिस इन्स्टिट्यूट,
सेनापती बापट मार्ग,
पुणे ४.

संदर्भ :- मुख्य वनसंरक्षक, (प्रा) पुणे यांचे कडील पत्र क्र. कक्ष १/जमीन/६४९/ दिनांक ३१/५/२००५.

विषयांकित प्रकरणाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, मौजे भांबुर्डा येथील स. नं. ८१ व ९४ मधील ०.७४४६ हेक्टर वनक्षेत्राचा वहानतळ व वनीकरण या प्रयोजनासाठी वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गतचा प्रस्ताव आपणा कडून या कार्यालयास सादर केला होता. प्राप्त प्रस्तावाची छाननी केली असता, खाली नमूद केलेल्या बाबी निदर्शनांस आलेल्या आहेत.

- मौजे भांबुर्डा येथील स.नं. ८१ चे संपुर्ण क्षेत्र २.८६ हेक्टर आहे. त्यापैकी ०.४८८६ हेक्टर क्षेत्राची आपण मागणी केलेली आहे. या स.नं. मध्ये आपण मागणी केल्यानंतर उर्वरीत क्षेत्र २.३७१४ हेक्टर क्षेत्र शिल्लक राहत आहे. तसेच स.नं. ९४ चे एकूण क्षेत्र ५.१४ हेक्टर आहे. त्यापैकी आपण मागणी केलेले ०.२५५६० क्षेत्र ऐवढे आहे. त्यामुळे सदर स.नं. मध्ये उर्वरीत क्षेत्र ४.८८४४ क्षेत्र शिल्लक राहत आहे. वर नमूद केलेले दोन्ही स.नं. मधील क्षेत्र हे आपण मागणी केल्यानंतर उर्वरीत वनविभागाकडे शिल्लक राहणारे क्षेत्र हे अत्यल्प राहत आहे. तसेच हे क्षेत्र वनक्षेत्राशी सल्लग्न राहत नाही. आपण प्रस्तावित केलेल्या क्षेत्रा व्यतिरिक्तचे क्षेत्राचे व्यवस्थापन व संरक्षण करणे प्रशासकीय व तांत्रिक बाबतीत अडचणीचे होणार आहे. तसेच शिल्लक राहत असलेले क्षेत्र हे एका बाजूला राहत असल्याने भविष्यात या क्षेत्रात अतिक्रमण होण्याची शक्यता आहे.

 (५)

- मागणी केलेले क्षेत्र यापूर्वी आपणास वनीकरणासाठी भाडे पट्ट्याने देण्यांत आले होते. परंतू सदर क्षेत्राचा वापर झाडे लावणेसाठी न करता इतर वनेत्तर वापरासाठी प्रस्तावित केलेले आहे. त्यामुळे एकाच उद्देशासाठी परत तेच क्षेत्र देणे / मागणी करणे संयुक्तीक होणार नाही.

- तसेच स. नं. ८१ मधील भाडे तत्वाचा करार हा वन (संवर्धन) अधिनियम १९८० हा कायदा अस्तित्वात आल्याने रद्द झाला आहे. कृपया याची नोंद घ्यावी.

- तसेच वनक्षेत्रपाल, भांबुर्डा यांनी सदर क्षेत्राची तपासणी केली असता, या क्षेत्रास आपण बेकायदेशीररित्या तार कंपाऊंड घातल्याचे निदर्शनास आल्याने. वनक्षेत्रपाल, भांबुर्डा यांनी प्रथम गुन्हा रिपोर्ट क्र. ओ. १/२००२-०४/२७/६/२००३ तसेच ओ. १/२००५-०६/११/६/२००५ अन्वये दाखल केला आहे. त्याची चौकशी चालू आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेऊन, आपण वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत सादर केलेला प्रस्ताव, प्रशासकीय/तांत्रिक अडचणीमुळे व न्यायीक दृष्टीकोणातून संस्करण न करता या कार्यालयाचे स्तरावर नस्तीबध्द करण्यांत येत आहे. कृपया या संबंधी भविष्यात पत्रव्यवहार करु नये.

सही/-
उपवनसंरक्षक
पुणे वनविभाग पुणे

प्रतिलिपी,

(१) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) पुणे यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.
(२) सहाय्यक वनसंरक्षक (भवका), पुणे यांचे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
(३) वनक्षेत्रपाल, भांबुर्डा यांचे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

उपवनसंरक्षक
पुणे वनविभाग पुणे

Received
15/06